# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०


जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/ 2170 /२०१९
दिनांक : 4 SEP 2019

प्रति,
मे.--------------------------------------------------

--------------------------------------------------

--------------------------------------------------

विषयः- सुंठ ..दरपत्रक मागणी

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबत परिशिष्टात नमूद तपशीलाप्रमाणे सुंठ दरपत्रक पध्दतीने खालील अटी-शर्तीस अनुसरून खरेदी करावयाची आहे. त्यास अनुसरून आपण आपले दर सोबतचे परिशिष्टात भरून परिशिष्ट आपले लेटरहेडवरील कव्हरींग पत्रासह सादर करावे.

अटी/शर्ती –

१. सोबतचे परिशिष्ठामध्ये आपले दर भरून आपल्या दुकानाचे कव्हरींग पत्रासह दयावयाचे आहेत. आपले दर **सर्व कर, जीएसटी, टीडीएस, हमाली, वाराई शिर्डी येथील संस्थानचे भांडार विभागात पोहचचे वाहतूक खर्चासह प्रती किलोचे दर सादर करावेत.**
२. सुंठ पुरविलेनंतर साधारण एक महिन्यामध्ये त्याचे बील आदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी संस्थानकडून आगाऊ रक्कम (अॅडव्हान्स) दिली जाणार नाही.
३. सिलबंद पाकिटातील दरपत्रक संस्थानचे आवक-जावक विभागामध्ये विहित मुदतीत जमा करावेत. पाकिटावर **"सुंठ खरेदी दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
४. सुंठ हि ३ टप्प्यांमध्ये पुरवावी लागेल. पहित्या टप्प्यामध्ये ५० किलो व नंतर मार्च २०२० पर्यंत आणखी दोन टप्प्यांमध्ये गरजेनुसार खरेदी केली जाईल.
५. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अगर सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहाणार नाही.
६. शिर्डी संस्थान हे धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.
७. दरपत्रकासोबत आपले लेटरहेडवरील पत्रात आपला GST क्रमांक व पॅन नंबर नमूद करावा.
८. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहिल.
९. दरपत्रक सादर करण्याची अंतीम दिनांक १० / ०९ /२०१९.

(दीपक मुगळीकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

My document/ quotation form

## सुंठ खरेदी दरपत्रक परिशिष्ट

| अ.नं | मालाचा तपशिल | मागणी किलो | दर प्रती किलो सर्व समावेशक खर्चासह | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | सुंठ- वाळलेली, चांगल्या प्रतीची-कोरी<br>Ginger (Sunth)-Dry, Best Quality- Unpolished | २५० किलो | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का